# चिपळुणातील जलसंमेलनाची जय्यत पूर्वतयारी
# संमेलन नगरीला 'कै. भवरलाल जैन नगर' नाव

**चिपळूण :-** चिपळूण येथ जानेवारी महीन्यात होणा-या जल साहित्य संमेलनाची पूर्वतयारी होत आली आहे. हे संमेलन विरेश्वर मंदिर परिसरातील पटांगणात होणार असून संमेलननगरीला जलदूत कै.भवरलाल जैन नगर असे नाव देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे.



जुन्या पद्धतीने शेतात धो धो पाणी दिले जायचे पाणी वाचविणे ही काळाची गरज ओळखून त्या ऐवजी ठिबक सिंचनाचा वापर करून पाणी वाचवीण्याचा संदेश भारतात सर्वप्रथम दिला तो कै.भवरलाल जैन यानी भारतातच नव्हे तर इस्त्रायल सारख्या दूरदेशातही आज जैन उद्योगसमूह कार्य करीत आहे.कै.भवरलालजींच्या कार्याला आदरांजली म्हणून हे संमेलन त्याना समार्पित करण्यात येणार आहे.

कोकणात शेतीसाठी नवनवीन प्रयोग करण्यासाठी शेतक याना उद्युक्त करणारे कृषीभूषण कै.रणजित खानविलकर यांचे नाव संमेलनाच्या व्यासपीठाला देण्यात येणार आहे.

कोकणातील शेतकरी आज वेळी लागवड करताना दिसतात याचो सर्वस्वी श्रेय कै.रणजित खानविलकर यांचो आहे.शेती विकासाचा अहोरात्र ध्यास घेतलेल्या रणजित खानविलकरांचे गतवर्षी दु:खद निधन झाले.जल साहित्य संमेलनाच्या पहिल्या बैठकीला उत्साहाने आलेले रणजित खानविलकर यांचे नांव व्यासपीठाला देऊन संचालक समितीने कृतज्ञता व्यक्त केली आहे.संमेलनाचे अन्य कार्यक्रम "रविणे सुरू असून अंतिम स्वरूप लवकरच जाहीर होईल.

संमेलनातून पाणी वाचविण्याचा संदेश दिला जाणार आहे.त्यामुळे संमेलनाला सरपंच, नागरीक,विद्यार्थ्यानी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजन समितीने कार्यवाह श्री.प्रकाश काणे यानी केले आहे.